RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016–18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष २, अंक ५९] सोमवार, जून २७, २०१६/आषाढ ६, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ९७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ जून २०१६.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक अरजा. २०१५/प्र.क्र.२२/सेवा-६.—भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ ला आणखी सुधारणा करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांस, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) (सुधारणा) नियम, २०१६ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा ) नियम, १९८१ (यात यापुढे ज्याचा उल्लेख "मुख्य नियम" असा करण्यात आला आहे) च्या नियम ६७ पोट-नियम (३) मधील "शासकीय कर्मचाऱ्याने स्वत: होऊन राजीनामा दिला असेल अथवा नोकरी सोडली असेल तर त्याला १५० दिवसांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, त्याच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या निम्मी रजा मंजूर करता येईल." हा भाग वगळण्यात यावा.

३. मुख्य नियमांच्या नियम ६८ च्या,—

(i) शीर्षकात "नियत वयोमान सेवानिवृत्तीच्या वेळी कर्मचाऱ्यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या संबंधातील रजा वेतनाची सममूल्य रोख रक्कम" च्या ऐवजी "नियत वयोमानाने सेवानिवृत्त/सक्तीने सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त/रुग्ण सेवानिवृत्त/स्वत: होऊन राजीनामा अथवा नोकरी सोडणारे कर्मचारी यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या संबंधातील रजा वेतनाची सममूल्य रोख रक्कम" असा समावेश करण्यात यावा.

(ii) मुख्य नियमांच्या नियम ६८ पोट-नियम (६) नंतर पुढील पोट-नियम समाविष्ट करण्यात यावा व तो दिनांक २५ मे १९८४ पासून लागू असल्याचे समजण्यात यावे :—

6900
3 AUG 2016

"(७) रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी हा, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन ) नियम, १९८२ च्या नियम १० किंवा नियम ६५ अन्वये सेवानिवृत्त होणाऱ्या किंवा सेवानिवृत्त करण्यात आलेल्या, किंवा नियम ६६ अन्वये सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यास सेवानिवृत्तीच्या तारखेस त्याच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या कालावधी इतकी, मात्र ३०० दिवसांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून रजा वेतनाची सममूल्य रोख रक्कम या नियमात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने स्वाधिकारे मंजूर करील."

(iii) पोट-नियम (७) नंतर, जो समाविष्ट केला आहे, खालील पोट-नियमाचा समावेश करण्यात यावा व तो दिनांक ३ नोव्हेंबर १९९२ पासून लागू असल्याचे समजण्यात यावे :—

"(८) रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी हा, रुग्ण म्हणून सेवानिवृत्त होणाऱ्या किंवा सेवानिवृत्त करण्यात आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास सेवानिवृत्तीच्या तारखेस त्याच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या कालावधी इतकी, मात्र ३०० दिवसांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून रजा वेतनाची सममूल्य रोख रक्कम या नियमात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने स्वाधिकारे मंजूर करील."

(iv) पोट-नियम (८) नंतर (जो समाविष्ट केला आहे) खालील पोट-नियमाचा समावेश करण्यात यावा :—

"(९) रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी हा, स्वत: होऊन राजीनामा देणाऱ्या किंवा नोकरी सोडणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या सेवा समाप्तीच्या तारखेस त्यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या कालावधीइतकी, मात्र ३०० दिवसांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून रजा वेतनाची सममूल्य रोख रक्कम या नियमात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने स्वाधिकारे मंजूर करील."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विदया वाघमारे,**
शासनाच्या उप सचिव.

पृ.पत्र क्र.विकाऔ/आस्था-१/२०१६/६८५४
दिनांक:- 22 NOV 2016

प्रति,
**प्राचार्य,**
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद.
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद.
**प्राचार्य,**शासकीय तंत्रनिकेतन,
औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतूर/हिंगोली/नांदेड/बीड/उस्मानाबाद/पु.ला.शा.तं.लातूर/शा.नि.म.तं.लि.लातूर
**उपसचिव,**महराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद.

यांना कळविण्यात येते की,महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम-१९८१ या नियमात करण्यात आलेल्या आणखी काही सुधारणा आपल्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या संबंधातील रजा वेतनाची सममूल्य रोख रक्कम मिळणे बाबतचा प्रस्ताव मंजुर करताना त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद.

प्रत:-या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यास्तव.